केंद्र शासनाकडे शिफारस केलेल्या परंतु
अद्याप पेन्शन मंजूर न झालेल्या स्वातंत्र्य
सैनिकांना राज्यशासनाची पेन्शन देण्याबाबत.

महाराष्ट्र शासन,
सामान्य प्रशासन विभाग,
शासन निर्णय, क्रमांकः पीओजेस-१२८३/११६५/विक१स्वासे,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक :- १७ जुन, १९८३

शासन निर्णय :- केंद्र शासनांतर्गत सन्मान पेन्शन योजनेव्दारे स्वातंत्र्य सैनिक पेन्शन मंजूरीसाठी महाराष्ट्र शासनाकडून शिफारस केलेल्या स्वातंत्र्य सैनिकांना पेन्शन मंजूर होण्यास विलंब होतो म्हणून स्वातंत्र्य सैनिकांना बऱ्याच आर्थिक अडचणींना तोंड द्यावे लागते याचा विचार करून स्वातंत्र्य सैनिकांना केंद्र शासनाचे पेन्शन मंजूर होईपर्यन्त आर्थिकदृष्ट्या होणारी कुचंबणा थोड्या फार प्रमाणात कमी करण्याच्या दृष्टीने शासनाने असा निर्णय घेतला आहे की, ज्या स्वातंत्र्य सैनिकांची प्रकरणे केंद्र शासनाच्या पेन्शन मंजूरीसाठी शिफारस केली आहेत त्यांच्या बाबतीत त्यांना केंद्रशासनाचे पेन्शन मंजूर होईपर्यन्त राज्य शासनाकडून द.म.रु. १५०/- प्रमाणे पेन्शन मंजूर करावी व केंद्र शासनाचे पेन्शन मंजूर झालेल्या तारखेपासून राज्यशासनाकडून केंद्रशासकीय पेन्शनधारकांना शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांकः पीओजेस-१०८२/विक१स्वासे, दि. ६/९/८२ अन्वये मंजूर केलेल्या अतिरिक्त पेन्शन द.म.रु. १००/- चालू ठेवावी म्हणजे उपरोक्त शासन निर्णय अन्वये मंजूर केलेल्या अतिरिक्त पेन्शनपेक्षा स्वातंत्र्य सैनिकांना केंद्रशासनाकडून मंजूर होईपर्यन्तच्या कालावधीमध्ये द.म.रु. ५० एवढी जादा रक्कम त्यास देण्यात येणार असल्याने शासन पुढे असेही आदेश देत आहे की, स्वातंत्र्य सैनिकांना केंद्रशासनाकडून पेन्शन मंजूर होईपर्यन्तच्या कालावधीसाठी द.म.रु. ५०/- प्रमाणे दिलेल्या जादा रकमेची वसुली करू नये.

वर नमूद केलेला खर्च, लेखाशीर्ष ''२८८-सामाजिक सुरक्षा व कल्याण (इ) इतर सामाजिक सुरक्षा व कल्याण कार्यक्रम (सी) स्वातंत्र्य सैनिक व त्यांच्यावर अवलंबून असणाऱ्या व्यक्तींनी निवृत्तीवेतन या अर्थसंकल्प शीर्षाखाली मागणी क्र. १४ च्या खाती खर्च दाखविण्यात यावा व तो वित्त विभागाने त्यांच्या ज्ञापन क्र. सीएनस्स १२८२/३७/बीयुडी-१३, दि. २/९/८३ व्दारे मंजूर केलेल्या आकस्मिक निधीतील रु. ८,१०,००० च्या अग्रिमातून भागविण्यात यावा.

प्रत्येक जिल्हाधिकाऱ्याकडे सोपविलेल्या आकस्मिकता निधीबाबतच्या अग्रिमाचे विवरणपत्र सोबत जोडलेल्या परिशिष्टामध्ये आहे. सदरहू अग्रिम तीन महिन्यात खर्च करावयाचा असून त्याबाबतचा अहवाल प्रत्येक महिन्याला सादर करण्याची जिल्हाधिकाऱ्यांना विनंती करण्यात येते.

विधीमंडळाच्या आगामी अधिवेशनात आकस्मिकता निधीच्या रूपये ८,१०,०००/- अग्रिमाची परिपूर्ती पुरक मागणीद्वारे करण्यात येईल.

यावावतचा खर्च पूरक मागणी मंजूर झाल्यावर उपरोक्त शीर्षाखाली खर्च म्हणून दाखविण्यात येईल.

जिल्हाधिकाऱ्यांनी यावावतची देयके सादर करताना खालील बाबी लक्षात घ्याव्यात.

१) वेगळी देयके करून आकस्मिक निधीतून काढलेली रक्कम दाखविण्यात यावी.

२) आकस्मिक निधीतून अग्रिम हे शब्द तांबड्या शाईने देयकावर दाखवावेत.

हे आदेश दिनांक १/५/१९८३ पासून अमलात येतील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(दा. प. कोंबके)
उप सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रति,

राज्यपाल यांचे सचिव,
मुख्यमंत्री यांचे सचिव,
उपमुख्यमंत्री यांचे सचिव,
सर्व मंत्री/राज्यमंत्री/उपमंत्री यांचे खाजगी सचिव,
अध्यक्ष व इतर सदस्य स्वातंत्र्य सैनिक उच्चाधिकार समिती,
महालेखापाल, महाराष्ट्र राज्य १, मुंबई.
महालेखापाल, महाराष्ट्र राज्य २, नागपूर,
सर्व विभागीय आयुक्त,
सर्व जिल्हाधिकारी,
सर्व कोषागार अधिकारी,
अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई.
वित्त विभाग,
मंत्रालयातील सर्व विभाग,
माहिती व जनसंपर्क संचालनालय (प्रसिध्दीपत्रक काढण्यासाठी).